महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

बुधवार ■ 26 मार्च 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 268 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# आता घरबसल्या मिळणार ई-मुद्रांक प्रमाणपत्र

## विधान परिषदेत विधेयक मंजूर

### नवीन विधेयकात काय झाले बदल?

- नागरिकांना आता कुठेही आणि कधीही ऑनलाइन स्टॅम्प शुल्क भरता येणार
- ई-मुद्रांक प्रमाणपत्रासाठी कोणत्याही कार्यालयात जाण्याची गरज नाही
- 500 रुपये शुल्क कायम असून कोणताही अतिरिक्त भार लागणार नाही
- स्टॅम्प पेपर विकत घेण्याचा पर्याय काय उघडा राहणार, त्यासाठी कुणावरही सक्ती नाही



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधान परिषदेत महाराष्ट्र मुद्रांक सुधारणा विधेयक मांडले. या विधेयकाला मंजुरी देण्यात आली आहे. या विधेयकाच्या माध्यमातून राज्य सरकारने स्टॅम्प ड्युटी आणि नोंदणी प्रक्रियेत आमूलाग्र बदल केले आहेत. त्यामुळे आता नागरिकांना घरबसल्या ऑनलाइन ई-मुद्रांक प्रमाणपत्र मिळवण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. विधान परिषदेत महाराष्ट्र मुद्रांक सुधारणा विधेयक मांडताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, 2004 पासून सुरू असलेल्या जुन्या प्रक्रियेमध्ये नागरिकांना स्टॅम्प पेपरसाठी विक्रेत्याकडे जावे लागत होते आणि त्यासाठी मर्यादा होती. तसेच फ्रँकिंगसाठी वेगळ्या केंद्रांवर जावे लागत होते आणि नोंदणी प्रक्रियेदरम्यान ई-चलन भरल्यानंतरही त्याची प्रिंट काढून कार्यालयात सादर करावी लागत होती. मात्र आता राज्य सरकारने या सर्व बाबींना पूर्णविराम दिला आहे, अशी माहिती बावनकुळे यांनी दिली.

**स्टॅम्प शुल्क किती लागणार याबाबत नागरिकांमध्ये नेहमीच गोंधळ असतो. त्यामुळे राज्य सरकारने त्यावर तोडगा काढत अभिनिर्णय प्रक्रियेत मोठे बदल केले आहेत. एखाद्या दस्तऐवजावर स्टॅम्प शुल्क किती लागेल हे कळण्यासाठी आता अर्ज करताना तो कोऱ्या कागदावर न करता, थेट हजार रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर करावा लागणार आहे. जर स्टॅम्प शुल्क जास्त भरले गेले, तर 45 दिवसांत नागरिकांना त्यांचे पैसे परत मिळतील. पण नागरिकांनी कमी पैसे भरले असतील तर त्यांना तत्काळ लागू असलेले शुल्क भरावे लागेल,**

**- चंद्रशेखर बावनकुळे**

# मुरबाड तालुक्यातील शेतकऱ्यांना मिळणार भात खरेदीचा बोनस

## आ. किसन कथोरेंच्या प्रयत्नांना यश



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड तालुक्यातील,सन २०२०-२१ मध्ये सुमारे ५०० हुन अधिक शेतकरी बांधवांना ऑनलाईन नोंदणी मध्ये अडचण आल्यामुळे भात खरेदीचा बोनस मिळाला नव्हता,या शेतकऱ्यांच्या पाठीशी बोलें तैसा चाले या उक्ती प्रमाणे आमदार मा.श्री.किसन कथोरे सामाजिक कार्यकर्ते,रमेश हिंदुराव व शेतकरी बांधव सतत पाठपुरावा करत होते.

सध्या सुरू असलेल्या अर्थसंकल्पिय अधिवेशनात आमदार किसन कथोरे यांनी हा प्रश्न उचलून धरला होता,त्या अनुषंगाने सोमवार दि.२४ मार्च २०२५ रोजी विधी मंडळात हा प्रश्न उपस्थित करण्यासाठी संधीही मिळाली,परंतु त्यांच्या कुटुंबात दु:खद घटना घडल्यामुळे अधिवेशनाला उपस्थित राहता आले नव्हते, तरीही शेतकरी बांधवांना न्याय मिळावा या भावनेने आमदार किसन कथोरे यांनी सहकारी आमदार श्री.संजयजी केळकर यांचेमार्फत हा प्रश्न विधीमंडळ सभागृहात उपस्थित केला आणि संबंधित मंत्री महोदयांकडून सकारात्मक उत्तर मिळविण्यात यश मिळविले.

लवकरच हा प्रलंबित प्रश्न मार्गी लागून मुरबाड तालुक्यातील ५०० शेतकरी बांधवांना भात खरेदी पोटी चा ७९ लाख रुपयांचा बोनस वाटप करण्यात येणार आहे.

आमदार मा.श्री.किसन कथोरे व सहकारी आमदार मा.श्री.संजय केळकर यांचे शेतकऱ्याकडून आभार मानले जात आहेत.





# शालेय सुट्टयांचे वेळापत्रक बदलणार नाही

### भौगोलिक परिस्थिती आणि हवामानानुसारच शाळांचे वेळापत्रक - शिक्षणमंत्री दादा भुसे यांची ग्वाही



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) धर्तीवर राज्यात शाळांचे वेळापत्रक लागू केले जाणार असल्याची चर्चा गेले काही दिवस रंगली होती. या पार्श्वभूमीवर भौगोलिक परिस्थिती आणि हवामानानुसारच शाळांचे वेळापत्रक निश्चित केले जाईल, अशी ग्वाही शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी सोमवारी विधानसभेत दिली. त्यामुळे सुट्टयांचे सध्याचे वेळापत्रक बदलणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा भाग म्हणून राज्याने राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचा (एनसीआरटी) अभ्यासक्रम तसेच सीबीएससी परिक्षापद्धती स्वीकारली आहे. यामुळे निर्माण झालेला संभ्रम दूर करण्यासाठी भुसे यांनी सविस्तर निवेदन केले. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने बनवलेली पाठ्यपुस्तके आवश्यक ते बदल करुन तयार होत आहेत. आपली सध्याची परीक्षा पद्धती पाठांतरावर अधारीत असून आता ती बदलणार आहे. नव्या पद्धतीमुळे राज्यातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळेल व त्यांचे भविष्य घडेल, असा विश्वास शिक्षणमंत्र्यांनी व्यक्त केला. सीबीएसई अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर सतत लक्ष ठेवले जाते. राज्य, देश व जागतिक पातळीवरील ज्ञान विद्यार्थ्यांना मिळते, असे ते म्हणाले.

# ठाणे मनपा मलनिस्सारण विभागात घोटाळा ? - मनसेकडून चौकशीची मागणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** घोडबंदर भागातील बड्या बिल्डरांना परवानग्या तसेच ना हरकत दाखले देताना नियमांची पायमल्ली केल्याने पावसाळ्यात पुरस्थितीसारखे प्रकार घडू शकतात, अशी भीती एका उपअभियंत्याने वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पत्राद्वारे केल्याचे वृत्त लोकसत्तामध्ये प्रसिद्ध झाले असून याप्रकरणाची दखल घेऊन मनसेने थेट राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाकडे तक्रार दाखल करत याप्रकरणी चौकशी करण्याची मागणी केली आहे. यामुळे या परवानग्या वादात सापडण्याबरोबर संबंधित अधिकारी अडचणीत येण्याची चिन्हे निर्माण झाली आहे. घोडबंदर परिसरासाठी नियुक्त करण्यात आलेल्या एका उप अभियंत्याला डावलून अभियंता विभागातील काही वरिष्ठ अधिकारी आणि दुसऱ्याच परिसराचा कार्यभार असलेला एका उप अभियंत्याने वर्षभरात २१ बिल्डरांच्या प्रकल्पांना परस्पर परवानगी दिल्या आहेत. याबाबत घोडबंदरसाठी नियुक्त केलेल्या उप अभियंत्याने नगर अभियंत्याकडे तक्रार केल्यामुळे हा प्रकार उघडकीस आला आहे. या तक्रारीमध्ये अधिकार नसतानाही बिल्डरांना बिल्डरांच्या गृह प्रकल्पांना ना हरकत दाखला देणाऱ्या उपअभियंत्यावर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. अधिकार नसतानाही घोडबंदर भागात बिल्डरांच्या गृह प्रकल्पांना ना हरकत दाखला देणारा उप-अभियंत्याकडे गेली १२ ते १३ वर्ष वर्तकनगर, माजिवाडा-मानपाडा आणि ठाणे शहराचा कार्यभार असून सध्या त्याच्याकडे वर्तकनगर विभागाचा कार्यभार आहे. गेल्या १२ ते १२ वर्षात अटी व शर्तींची पुर्तता केलेली नसतानाही विकास प्रस्तावांना ना हरकत तसेच पुर्णत्वाचे दाखले दिल्याचा आरोप तक्रारदार उप अभियंत्याने पत्रात केला असून अशा परवानग्यांमुळे पावसाळ्यात पुरस्थितीसारखे प्रकार घडू शकतात, अशी भीतीही त्याने व्यक्त केली आहे. या संबंधीचे वृत्त प्रसिद्ध झाले असून याप्रकरणी महाराष्ट्र नव निर्माण सेनेचे पदाधिकारी संदिप पाचंगे यांनी राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण तक्रार दाखल करत २१ विकास प्रकल्पांना दिलेल्या परवानगीची चौकशी करण्याची मागणी केली आहे. तसेच घोडबंदर भागात दरवर्षी पाणी साचून मोठ्या प्रमाणावर वित्त हानी होते. यामुळे ठाणे महापालिकेच्या मलनिस्सारण विभागाच्या भ्रष्ट कारभाराविरोधात कठोर कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे

# एमआयडीसी पाणीपुरवठा योजनेतून खर्डी ग्रामपंचायतीला पाणी द्या

## - एमआयडीसीला साकडे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**खर्डी, ता.25 :** भातसा धरणाचच्या जलस्त्रोतातून खर्डी एमआयडीसीला पाणीपुरवठा होणार आहे व सद्या ह्या योजनेचे काम अंतिम टप्प्यात असून ह्या योजनेची पाईपलाईन खर्डीतून जात असल्याने ह्या एमआयडीसी च्या पाणीपुरवठा योजनेतून खर्डी ग्रापला पाणीपुरवठा करण्यात यावा यासाठी खर्डीतील उद्योजक गणेश राऊत यांनी नुकतीच एमआयडीसीच्या अभियंत्याची भेट घेऊन निवेदन दिले.खर्डी येथील दरवर्षी जाने पासून पाणीटंचाई सुरू होत असून येथील पाणीपुरवठा योजना तांत्रिक अडचणीमुळे वारंवार बंद पडत असते व त्यामुळे येथे एन उन्हाळ्यात कायमची पाणी टंचाई असते.ही पाणीटंचाई कायमची दूर व्हावी यासाठी एमआयडीसीने खर्डी ग्राप ला पाणीपुरवठा करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

स्थानिक लोकप्रतिनिधींनी खर्डीला एमआयडीसीने पाणीपुरवठा करावा यासाठी एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांशी पत्रव्यवहार करून सकारात्मक चर्चा केली आहे. खर्डी ग्राप करिता 1980 ला जिप मार्फत भातसा धरणातुन पाणीपुरवठा योजना राबविण्यात आली पण ती योजना कालबाह्य झाल्याने व अनेक तांत्रिक अडचणीमुळे ही योजना बंद करून 2017 ला जिप मार्फत चांदा-खर्डी पाणीपुरवठा योजना राबविण्यात आली आहे.सद्यस्थितीत ही योजना चालू-बंद स्थितीत असून वारंवार पाईप फुटणे,पंप बंद पडणे,वीज बिल न भरल्याने लाईट कट होणे यासारख्या अनेक तांत्रिक अडचणीमुळे ही योजनांची वारंवार बंद पडत असल्याने खर्डी ग्राप हद्दीत कायमस्वरूपी पाणी टंचाई असते.त्यामुळे येथील रहिवाशांना उन्हाळ्यात खाजगी बोअरवेल, टँकर व जार याचे पाणी अव्वाचे सव्वा पैसे देऊन पाणी विकत घेण्याची वेळ दरवर्षी येत आहे.

खर्डी येथे एमआयडीसी मंजूर झाली असून त्याचा आराखडाही बनवायचे काम सुरू आहे परंतु येथे मुलभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात या अनुषंगाने एमआयडीसीने प्रथम पाण्याची सोय करायला घेतली असून त्याकरिता भातसा जलाशयातून पाणीपुरवठा योजना राबविण्यात येत आहे.एमआयडीसीच्या भातसा धरणाची पाईपलाईन खर्डी गावातूनच येत असल्याने ह्या योजनेचे पाणी खर्डी तील रहिवाशांना उपलब्ध करावे अशी मागणी एमआयडीसी चे उपअभियंता यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.यावेळी उद्योजक गणेश राऊत,माजी सरपंच प्रशांत खर्डीकर, व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष अनिल पातकर, नरेश जाधव,शाकिर शेख, नितेश राऊत आदी मान्यवर उपस्थित होते.

# पल्लवी सरोदेंच्या शोकसभेत जिल्हाधिकाऱ्यांना अश्रू अनावर



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वीय साहाय्यक पल्लवी सरोदे (३७) यांचा श्रीक्षेत्र हरिहरेश्वर येथील समुद्र किनाऱ्यावर बुडून मृत्यू झाला. सोमवारी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात महसूल कर्मचारी संघटनेच्या वतीने पल्लवी सरोदे यांच्या शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्यासह सर्वच कर्मचाऱ्यांना अश्रू अनावर झाले होते. पल्लवी यांच्या १३ वर्षांचा मुलगा आणि तिच्या कुटुंबियांच्या मागे आपण सर्वांनी पहाडा प्रमाणे उभे राहू असे शिनगारे यावेळी म्हणाले.साहाय्यक महसूल अधिकारी तथा ठाणे जिल्हाधिकारी यांच्या स्वीय साहाय्यक म्हणून पल्लवी सरोदे या कार्यरत होत्या. सरोदे यांच्यासह त्यांच्या कार्यालयातील काही महिला कर्मचारी श्रीक्षेत्र हरिहरेश्वर येथे फिरण्यासाठी गेल्या होत्या. येथील समुद्र किनाऱ्यावरील दगडावर पल्लवी सरोदे या बसल्या होत्या. त्यावेळी समुद्राची एक लाट आली आणि या प्रवाहात सरोदे यांचा बुडून मृत्यू झाला. सरोदे यांच्या मृत्यूने जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांकडून हळहळ व्यक्त केली जात आहे. सरोदे यांच्या शोकसभेचे आयोजन ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयातील एका सभागृहात करण्यात आले होते. या शोकसभेत आठवणींना उजाळा देताना सर्वच अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना अश्रू अनावर झाले.





# कुळगांव बदलापूर नगरपालिका होणार पेपरलेस

### ई ऑफिसच्या माध्यमातून चालणार प्रशासनाचा कारभार - मुख्याधिकारी मारुती गायकवाड

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर :** कुळगांव - बदलापूर नगरपालिकेचा कारभार आता पेपरलेस होणार आहे. ई ऑफिसच्या माध्यमातून बदलापूर नगरपालिकेचा संपूर्ण कारभार चालणार असून या पुढील काळात दस्तऐवज गहाळ होणे, दस्तऐवज उपलब्ध नसणे, अधिकारी कर्मचारी जागेवर नसताना फाईल न सापडणे, ठेकेदार किंवा अधिकारी, कर्मचारी यांच्या बदलीनंतर ती फाईल शोधण्यास विलंब लागणे, अशा साऱ्या प्रकाराला फाटा देत आता बदलापूर नगरपालिकेने आपला कारभार पेपरलेस करण्याचा निर्णय घेतला आहे. गेल्या काही दिवसांपासून प्रायोगिक तत्त्वावर सुरू असलेलं कामकाज नगरपालिका प्रशासनाने पूर्ण केलं असून येत्या दोन दिवसात बदलापूर नगरपालिकेचा शंभर टक्के कारभार पेपरलेस करून ई ऑफिस सुरू करणार असल्याची माहिती कुळगांव बदलापूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक मारुती गायकवाड यांनी दिली.ई ऑफिस सुरू झाल्यानंतर प्रत्येक विभागाच्या कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना नगरपालिकेच्या पोर्टल द्वारे स्वतंत्र अकाउंट तयार करण्यात येणार आहे. या





माध्यमातून सुरुवातीपासून ते थेट मुख्याधिकाऱ्यांपर्यंत येणारी फाईल ही पेपरलेस राहणार आहे. संपूर्ण कारभार हा ऑनलाइन माध्यमातूनच चालू होणार असून एखाद्या फाईल मध्ये असलेले पेपर पूर्ण आहेत का ? त्याची संपूर्ण माहिती आता एका क्लिकवर मुख्याधिकाऱ्यांना उपलब्ध होणार आहे. तसेच ई ऑफिस सुरू झाल्यामुळे माहिती अधिकार व नगरपालिकेचा कारभार अधिक पारदर्शकपणे होणार असल्याचेही मुख्याधिकारी मारुती गायकवाड यांनी सांगितले. पेपरलेस कारभारामुळे नगरपालिका प्रशासनाचा प्रशासकीय खर्च कमी करण्याचा ही हेतू असून नागरिकांना अधिक जलद आणि चांगल्या व दर्जेदार सुविधा देता याव्यात व अधिकारी कर्मचाऱ्यांचा वेळ वाचावा व नागरिकांना अधिक गतीने सुविधा देता याव्यात यासाठी कुळगांव बदलापूर नगरपालिका प्रशासनाने ई ऑफिस सुरू करण्याचा निर्णय घेतला असल्याचे मारुती गायकवाड यांनी सांगितले. यासंदर्भातील योग्य ते प्रशिक्षण अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना देण्यात आले असून बदलापूरच्या नागरिकांनीही याला सहकार्य करण्याचे आवाहन मारुती गायकवाड यांनी केले आहे.



# गीतासार



## अध्याय ६
## आत्मसंयमयोगः

श्रीभगवानुवाच अनाश्रितः कर्मफलं कार्यं कर्म करोति यः । स संन्यासी च योगी च निरग्निर्न चाक्रियः ॥ ६-१ ॥

भगवान श्रीकृष्ण म्हणाले, जो पुरुष कर्मफळाचा आश्रय न घेता कर्तव्य कर्म करतो, तो संन्यासी व योगी होय. आणि केवळ अग्नीचा त्याग करणारा संन्यासी नव्हे; तसेच केवळ क्रियांचा त्याग करणारा योगी नव्हे. ॥ ६-१ ॥

न संन्यासमिति प्राहुर्योगं तं विद्धि पाण्डव । न ह्यसंन्यस्तसङ्कल्पो योगी भवति कश्चन ॥ ६-२ ॥

हे पांडवा (अर्थात पांडुपुत्र अर्जुना), ज्याला संन्यास असे म्हणतात, तोच योग आहे, असे तू समज. कारण संकल्पांचा त्याग न करणारा कोणीही पुरुष योगी होत नाही. ॥ ६-२ ॥

आरुरुक्षोर्मुनेर्योगं कर्म कारणमुच्यते । योगारूढस्य तस्यैव शमः कारणमुच्यते ॥ ६-३ ॥

योगावर आरूढ होण्याची इच्छा करणाऱ्या मननशील पुरुषाला योगाची प्राप्ती होण्यासाठी निष्काम कर्म करणे हाच हेतू सांगितला आहे आणि योगारूढ झाल्यावर त्या योगारूढ पुरुषाचा जो सर्व संकल्पांचा अभाव असतो, तोच कल्याणाला कारण सांगितला आहे. ॥ ६-३ ॥

# माजी विद्यार्थी आणि शिक्षकांचे स्नेहसंमेलन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : गरीब,गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी, ज्यांनी ज्ञानाचे दारे खुले करून, संपूर्ण आयुष्य समाजसेवेसाठी घातलेले, सुनील आयवळे सर यांच्या हाजुरी गाव, ठाणे येथील रेणुका ट्युशन क्लासेसच्या माजी विद्यार्थी आणि शिक्षक यांचा स्नेहसंमेलन समारंभ सहाय्यक वनसंरक्षक सभागृह,येऊर ,ठाणे येथे मोठ्या उत्साहात पार पडला.

उच्च विद्याविभुशीत होऊन, समृद्ध आयुष्य जगत असणारे, परदेशात नोकरीं, व्यवसाय करत असणारे माजी विद्यार्थी यांनी जुन्या आठवणीना उजळा देण्यासाठी, खास करून प्रामुख्याने मंगेश किलजे, जितेंद्र भोसले, सतीश देशमुख, सुशांत हेगडे, रत्नदीप शेलार, स्वप्नीला किलजे, स्वप्नाली टोणपे, वैशाली पाटील, संदीप शेलार, संगीता उतेकर, राम शिंदे, निलेश वारिक, निलेश जाधव यांनी इच्छाशक्ती निर्माण करून, पुन्हा एकदा एकत्र येऊन भेटावे. म्हणून गेट टुगेदर कार्यक्रमाचे आयोजन केले. कार्यकामाच्या सुरुवातीला सर्व उपस्थित सर्व शिक्षकांना मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. क्लास मधील गमती जमती आणि क्लास मुळे आपण कसे घडलो ? हे सांगितले. इंग्लिश शिकवणारे सुनिल आयवळे सर, गणित शिकवणारे निधानकर, समाज शास्त्र शिकवणारे सुरेश यादव सर, विज्ञान शिकवणारे संतोष थोरात सर व इंग्रजी शिकवणारे सतिश देशमुख सर या सर्व शिक्षकांबद्दल, सर्वच विद्यार्थांनी गौरव उद्गार काढले. तसेच त्या काळी शिक्षकांच्या धाकामुळे विदयार्थी अभ्यास करत असायचे, याचा ही उल्लेख अनेक विदयार्थ्यांनी केला. शिक्षकांनी ही आपले मनोगत व्यक्त केले. सर्व विदयार्थ्यांना आशीर्वाद आणि शुभेच्छा दिल्या.

### कुणाल कामराविरोधात
# डोंबिवलीत शिवसेनेचे आंदोलन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : कॉमेडियन कुणाल कामरा याने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर गाण्यातून व्यंगात्मक टीका केल्याने शिवसैनिक प्रचंड संतापले आहेत. डोंबिवलीत सोमवार 23 तारखेला डोंबिवलीतील इंदिरा चौकात शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिकांनी निषेध आंदोलन केले. कुमाल कामरा याने माफी मागावी नाहीतर त्याच्या चेहऱ्याला काळे फासू असे शिवसैनिक म्हणाले. शिवसेना कामरा विरोधात गुन्हा दाखल करणार आहोत असे यावेळी तालुकाप्रमुख महेश पाटील म्हणाले. आंदोलनात कामराच्या फोटोला काळे फासत घोषणाबाजी करण्यात आली.यावेळी माजी नगरसेवक विश्वनाथ राणे,, रणजीत जोशी, संजय पावशे ,कविता गावंड, शीतल लोके, दिनेश शिवलकर, तेजस पाटील, दत्ता वझे, सुदाम जाधव यासह अनेक शिवसैनिक होते.

# पाणी वाचवणे ही काळाची गरज



लेखक
विवेक कुलकर्णी, फोंडा.

वैदिक संस्कृतीमध्ये आर्यांनी पंचमहाभूतांना देव मानले. पृथ्वी, पाणी, तेज, वायू, आकाश ही पंचमहाभूते. त्यांचे आपल्या जीवनावर असलेले उपकार आणि त्यांचे महत्त्व ओळखून त्यांनी आपल्यावर संतुष्ट राहावे व त्यांच्याविषयी कृतज्ञता बाळगावी या हेतूने पंचमहाभूतांची पूजा सुरू झाली. पाणी हे त्यातील एक. अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजांमध्ये पाणी आहेच. पाण्यावरच सजीवांचे जीवन अवलंबून आहे. अन्नाशिवाय माणूस एकदोन दिवस राहू शकेल मात्र, पाण्याशिवाय एक क्षणही राहू शकणार नाही. सृष्टीतील सर्व सजीव पाण्यावरच जगतात. घर बांधण्यासाठीही पाण्याची आवश्यकता असते. उन्हाळ्यात पाण्याचे महत्त्व कळते. उन्हात तापून सगळी सृष्टी भाजून निघते. मात्र, पावसाने सारी सृष्टी पुन्हा जिवंत होते. तिला पुन्हा नवे जीवन मिळते म्हणूनच पाऊस पडायला लागला की, 'आता जीवनमय संसार' असे म्हणतात. पाण्याचे हे महत्त्व ओळखून आपण पाण्याची पूजा करतो. आजही नदी दिसली की, लोक तिला नमस्कार करतात, समुद्राला नारळ देतात, तसेच घरामध्येही 'उदकशांत' हा विधी करतात. निसर्गामध्ये पाणी जास्त आहे कारण पाणी हा निसर्गाचाच एक घटक आहे. खेड्या-पाड्यात, डोंगर-दऱ्यांत, सृष्टीसौंदर्य दृष्टीत पडते, कारण तेथे पाण्याचे जिवंत स्त्रोत असतात.

पूर्वी लोकसंख्या कमी होती, सुधारणाही झालेली नव्हती. त्यामुळे जंगलांची संख्याही जास्त होती. पाऊसही नियमित पडायचा. त्यामुळे पाणी सहज उपलब्ध होत होते. मात्र, गेल्या काही वर्षांपासून ही स्थिती बदललेली आहे. लोकसंख्या भरमसाट वाढल्याने जंगले तोडून त्या ठिकाणी इमारती, उद्योगधंदे उभे राहिले आहेत. जंगले नष्ट केल्याने पर्यावरणाचे संतुलन बिघडले आहे. वातावरणात उष्मा वाढला आहे, पावसाचे चक्र बदललेले, वृक्षतोड केल्याने जमिनीतील जलस्त्रोत आटले आहेत, तसेच आज मोठ्या प्रमाणावर माणसाकडून पाण्याचा दुरुपयोग केला जात आहे. त्यामुळे आज पाण्याची कमतरता भासत आहे. नद्या, नाले, सरोवरे हे गाळाने भरल्यामुळे झऱ्यांची मुखे बंद झाली आहेत. पूर्वी सहज उपलब्ध होणारे पाणी आज बाटलीत बंदिस्त करून १५ ते २० रुपयांना विकले जात आहे.

आज पाण्याची चोरी होत आहे, पाण्याची पळवापळवी होत आहे. पाण्यासाठी आज भांडणे, मारामाऱ्या होत आहेत. दूरवरच्या खेड्यापाड्यांत तर हिवाळा संपल्यापासून पावसाळा येईपर्यंत पाण्याचे प्रचंड हाल होत असतात. अन्नासाठी दाही दिशा, आम्हां फिरविशी जगदीशा या श्लोकाप्रमाणे पाण्यासाठी दाहीदिशा, आम्हां फिरविशी जगदीशा असे म्हणण्याची पाळी आली आहे. जमिनीत पाणी नसल्याने जमीन पडीक झाली आहे. या सर्वाला कंटाळून लोक गाव सोडून जात आहेत. अशीच स्थिती राहिली तर भविष्यात गावे ओस पडतील अशी भीती वाटू लागली आहे. दुसरीकडे गावातील लोकांनी शहराकडे धाव घेतल्याने शहरात लोकसंख्या वाढत आहे. यामुळे त्या ठिकाणीही पाण्याच्या टंचाईला लोकांना सामोरे जावे लागत आहे.

पावसाळ्यामध्ये डोंगरदऱ्यांवरून माती, पाचोळा मोठ्या प्रमाणात खाली पाण्याच्या प्रवाहाबरोबर वाहत येतो आणि तो ओहोळात, नद्यांत, तलावांत साठतो. परिणामी, पात्र उथळ बनते आणि पाणी वाहून जाते. म्हणून शासनाच्या मदतीने त्या त्या गावातील लोकांनी, स्वयंसेवी संस्थांनी नियमितपणे हा गाळ काढला तर तो काठावरच्या जमिनी सुपीक बनवील आणि झऱ्यांची मुखे उघडी राहून पात्रे खोल होऊन पाणीसाठे वाढतील.

आज पाणी वाचवायचे असेल तर नदी, नाले, सरोवरे तसेच डोंगर दऱ्यांतील झरे येथील गाळ काढणे आवश्यक आहे. झऱ्यांची मुखे उघडी राहिली तरच पाण्याची पातळी वाढेल. याबरोबरच जास्तीत जास्त वृक्ष लागवड करावी, जेणे करून पर्यावरणाचे बिघडलेले संतुलन पूर्ववत होण्यास मदत होईल. जंगल संपत्ती टिकवून ठेवून शक्य असेल तेथे वृक्ष लागवड केली, तर सावलीने पाण्याचे बाष्पीभवन तर कमी होईलच, पण पाऊस भरपूर व नियमित पडेल. वृक्षांची मुळे माती धरून ठेवतात. जमिनीची धूप त्यामुळे होणार नाही व झरे निर्माण होऊन ते जिवंत व प्रवाही राहतील. आज जर ही अवस्था आहे, तर आणखी काही वर्षांनी येणाऱ्या पिढीसाठी पाण्याची ही समस्या किती तीव्र बनेल याचा अंतर्मुख होऊन विचार करून पाण्याचा अपव्यय न करता ते जपून वापरणे महत्त्वाचे आहे. पाण्याचे हे महत्त्व, त्याची गरज आणि त्याचा गरजेनुसार पुरवठा, त्याचा होणारा अपव्यय आणि आहे ते राखणे आणि पुरवणे या गोष्टी आता प्रकर्षाने लक्षात आल्या आहेत. पर्यावरणाच्या असमतोलामुळेच पावसाचे प्रमाण घटले आहे. शिवाय त्यात अनियमितता आली आहे.

पाणी मिळण्याचा मुख्य स्त्रोत म्हणजे पाऊस. तोच आज बेभरवशाचा आणि अनियमित बनला आहे. जागतिक तापमान हळूहळू वाढतेच आहे. म्हणूनच या साऱ्या पार्श्वभूमीवर पाण्याचे जीवनातील स्थान सर्वांच्याच लक्षात येते आहे. प्रकर्षाने जाणवते आहे. त्यासंबंधीची जागृती करण्याचे प्रयत्न चालू आहेत. त्याचाच एक भाग म्हणून जलदिन साजरा होतो. आपणही या दिनी निश्चय करूया की पाण्याचे आजच्या काळातील महत्त्व ओळखून योग्य ती पावले टाकूया!


# डोंबिवलीत शहीद दिनानिमित्त अभिवादन सभा




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली - डोंबिवलीत विविध संघटनेच्या वतीने शाहिद दिनानिमित्त क्रांतीकारकांना अभिवादन करण्यासाठी सभेचे आयोजन करण्यात आले होते. सभेपूर्वी डोंबिवली शहरात शहिद भगतसिंग, सुखदेव, राजगुरू यांच्या प्रतिमा सह अभिवादन रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. अभिवादन सभेसाठी सुप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ विश्वास उटगी, सेक्युलर रिपब्लिकन पक्षाचे श्याम दादा गायकवाड, प्रा.प्रविण देशमुख , कॉंग्रेस प्रदेश सचिव संतोष केणे, कम्युनिस्ट पक्षाचे काळू कोमास्कर , शिवसेना उबाठा पक्षाचे जिल्हा संघटक तात्या माने, आंबेडकरवादी जनवादी संघटनेचे संदिप गजघाट, समाजसेविका प्रमिला सावंत उपस्थित होते. उपस्थितांना मार्गदर्शन करताना अर्थतज्ज्ञ विश्वास उटडी म्हणाले कि, आगामी लोकसभा निवडणुकीत पंतप्रधान मोदींना पराजित करायचे असेल तर विविध समविचारी पक्ष संघटनांनी एकत्र येणे गरजेचे आहे.भाजप आणि मोदींच्या कामगार, शेतकरी, आर्थिक धोरणांविषयी सडकून टिका केली, भारताची अर्थव्यवस्था पाच ट्रिलियन डॉलर पर्यंत कशी प्रगती करणार अशी शंका उपस्थित केली.भाजपच्या विरोधकांचा निवडणूकीतील पराभव हा निवडणूक आयोगाने केला. मतदारांनी नव्हे. आजच्या तरुणांनी भगतसिंगाच्या क्रांतीकारी विचारसरणीची कास धरावी असे आवाहन विश्वास उटगी यांनी केले. लालबावटा रिक्षा युनियन, अखिल भारतीय क्रांतिकारी संघटना, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया, क्रांतीकारी मार्क्सवादी पक्ष, शिक्षण युवा जन अधिकारी संघटना, राष्ट्र सेवा दल, इत्यादी पक्ष संघटना अभिवादन रॅली आणि सभेत सहभागी झाल्या होत्या.सभेचे सुत्रसंचालन अक्षय पाठक यांनी केले.या कार्यक्रमाचे नियोजन रंजना आठवले, विलास शेलार विलास शेळके, महेश आवारे यांनी केले.

### रेसिपी
# शिळ्या चपातीची खमंग बाकरवडी



**साहित्य**

१. उरलेल्या चपात्या - ४ ते ५ चपात्या
२. हिरव्या मिरच्या - ४ ते ५ मिरच्या
३. आलं - २ लहान तुकडे ४. लसूण पाकळ्या - ६ ते ७ पाकळ्या ५. बेसन - १ कप ६. पाणी - गरजेनुसार ७. हळद - १ टेबलस्पून ८. मीठ - चवीनुसार ९. लाल तिखट मसाला - १ टेबलस्पून १०. गरम मसाला - १ टेबलस्पून ११. कोथिंबीर - २ टेबलस्पून (बारीक चिरलेली)
१२. चिंच - गुळाची गोड चटणी - २ ते ३ टेबलस्पून १३. पांढरे तीळ - १ टेबलस्पून
१४. तेल - तळण्यासाठी

**कृती**

१. सगळयात आधी मिक्सरच्या भांड्यात हिरव्या मिरच्या, आलं, लसूण पाकळ्या घालून त्याची पेस्ट तयार करून घ्यावी.
२. आता एका बाऊलमध्ये बेसन आणि पाणी घेऊन त्याची थोडी घट्टसर पेस्ट तयार करून घ्यावी. या पेस्टमध्ये हळद, चवीनुसार मीठ, लाल तिखट मसाला, गरम मसाला आणि आलं लसूण हिरव्या मिरचीची तयार पेस्ट घालावी.
३. त्यानंतर या पेस्टमध्ये बारीक चिरलेली कोथिंबीर घालवी.
४. आता शिल्लक राहिलेल्या चपात्यांवर चिंच गुळाची चटणी व्यवस्थित पसरवून लावावी. मग त्यावर बेसनाची तयार पेस्ट पसरवून लावावी.
५. त्यानंतर वरून पांढरे तीळ भुरभुरवून घ्यावेत. मग या चपातीला गोलाकार आकारात रोल करावे. रोल केलेल्या चपातीचे छोटे छोटे तुकडे करून घ्यावेत. बाकरवडी प्रमाणेच गोलाकार तुकडे करून घ्यावेत.
६. एका कढईत तेल तापवून घ्यावे. या गरम तेलात बाकरवडी सोडून खरपूस तळून घ्यावी. सल्ला असा जो करेल पैसा मोठा ! उरलेल्या चपातीपासून तयार केलेली ३ ते ४ दिवस टिकणारी बाकरवडी खाण्यासाठी तयार आहे. ही बाकरवडी आपण एअर टाईट कंटेनरमध्ये स्टोअर करून ठेवू शकता.


### जीवनदीप महाविद्यालयात
# आरोग्य तपासणी शिबीर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

गोवेली : जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष श्री रविंद्र घोडविंदे हे समाज कल्याणासाठी नेहमीच तत्पर असतात. त्यामुळे त्यांच्या जीवनदीप संस्थेच्या वतीने वारंवार अनेक शिबिरांचे आयोजन करण्यात येत असते. दिनांक 28 मार्च 2025 रोजी जीवनदीप महाविद्यालय गोवेली येथे माननीय आमदार श्री किसन कथोरे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली कल्याण तालुक्यातील नागरिकांसाठी भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये मणक्यांच्या सर्व समस्या गुडघेदुखी सांधेदुखी विविध आजार व शारीरिक तपासणी केली जाणार आहे. सकाळी नऊ ते दुपारी दोन वाजेपर्यंत जीवनदीप महाविद्यालय गोवेली येथे या शिबिराचा लाभ घेता येईल.यावेळेस मुंबईतील प्रख्यात मणके स्पेशालिस्ट डॉक्टर आणि टीम वन स्पेन यांच्या वतीने मणक्याच्या गुडघेदुखी आणि सांधेदुखी आजाराचे निदान तपासणी व औषधोपचार हे संपूर्ण मोफतपणे उपलब्ध होणार आहे तसेच डॉ. प्रतीक्षा घोडविंदे डॉ.रिद्धी आव्हाड यांसारख्या तज्ञ डॉक्टरांचे विविध आजारांवर सल्ले आणि उपचार मिळणार आहेत. आजाराचे निदान झाल्यावर मोफत औषध देखील दिली जातील. यावेळेस नागरिकांनी मोफत शारीरिक तपासणी,औषधोपचार व सल्ला घेण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या शिबिराचा लाभ घ्यावा असे आव्हान करण्यात आल आहे.

### कल्याण तालुक्यातील ग्रामीण भागातील
# सर्वात मोठा घोटसईचा छबीना उत्साहात संपन्न





**या छबीना नंतर तालुक्यातील सर्व गावातील जत्रांना होतो प्रारंभ...**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

टिटवाळा : ठाणे जिल्ह्यात अनेक देवाच्या जत्रा सालाबाद प्रमाणे मोठ्या उत्साहात, भक्तीभावाने व आनंदाने संपन्न होत असतात. यंदा ही तितक्याच उत्साहात जत्रा सुरू होणार असल्याचे चित्र जिल्ह्यातील गावागात दिसून येत आहे. याच धर्तीवर कल्याण तालुक्याच्या ग्रामीण भागातील घोटसई गावामधील कानीफनांथ समाधी सोहळा अर्थात छबीना जत्रा सोमवारी मोठ्या उत्साहात व आनंदात सुरूवात झाली. दोन दिवस चालणाऱ्या या जत्रेत जिल्ह्यातून हजारो भाविक-भक्त व नागरिक हजेरी लावली.

कल्याण तालुक्यातील घोटसई गावातील कानीफनाथ समाधी सोहळा अर्थात सबीना जत्रे नंतरच तालुक्यातील सर्व जत्रांना प्रारंभ होतो. कानीफनाथ यांचे शिष्य महाजी बाबा यांची समाधी घोटसई गावात आहे. त्यांच्या समाधी सोहळयाच्या निमित्ताने दशमीला जत्रा आणि एकादशीला कुस्तीचे जंगी सामने भरविले जातात. संपूर्ण महाराष्ट्रातून कुस्तीगीर येथे येत आपली हजेरी लावतात. यावेळी मोठ-मोठ्या बक्षीसांची खैरात या कुस्ती सामन्या केली जाते. होळी पोर्णिमेला देवांच्या काठीचे घोटसई येथील कानीफनाथ मंदिरात पूजन केलं जातं. पंचमीला ही काठी घेऊन शेकडो भाविक-भक्त व पंचक्रोशीतील ग्रामस्थ भिवंडी तालुक्यातील सागाव येथे जिथे कानीफनाथ यांच्या शिष्यांची समाधी आहे तेथे जातात. त्यानंतर ती काठी पुन्हा घोटसई येथे आणतात. दशमीला घोटसई गावात मोठ्या उत्साहात जत्रेचे आयोजन केले जाते. गेली अनेक वर्षांपासून ही परंपरा चालत आली आहे. छबीना निमित्ताने मंदिरासमोर हरिपाठ व भजन अशा विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आलं होतं. रात्री बारा वाजता गावातून या देवाच्या काठीची भव्य पालखी मिरवणूक काढली. शेकडो भाविक भक्त व भजनी मंडळी पालखी मिरवणूकीत सहभागी झाले होते. रात्रभर संपूर्ण गावातून पालखी मिरवणूक काढण्यात आली. दुसऱ्या दिवशी एकादशीला कुस्तीचे सामने आणि इतर अनेक विविध कार्यक्रमांचे आयोजनामुळे या जत्रेस शहापूर, मुरबाड, अंबरनाथ, बदलापूर, कल्याण, भिवंडी, आणि उल्हासनगर येथील हजारोंच्या वर भाविक व नागरिक हजेरी लावतात. यामुळं गावत मोठ्या प्रमाणावर गर्दी दिसून आली. यावेळी विविध खेळ, आकाश पाळणे, मौतका कुआ असे अनेक खेळ व वस्तूची दुकाने लागली होती. खरेदीसाठी मोठ्या प्रमाणावर महिला, पुरूष, तरुण-तरुणी व बच्चे कंपनी यांनी गर्दी केली होती. कुठल्याही प्रकाचा अनुचीत प्रकार घडू नये या करिता कल्याण तालुका पोलीस ठाण्याच्या वतीने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. या जत्रे नंतर तालुक्यातील ग्रामीण भागात अनेक गावातील जत्रांना प्रारंभ होतो.

# कॅ.विनयकुमार सचान यांच्या स्मृतीदिनी महापालिकेतर्फे भावपूर्ण आदरांजली



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महापालिका परिसरातील डोंबिवली शहरात राहणारे शूर वीर कॅ.विनयकुमार सचान यांना मातृभूमीच्या रक्षणासाठी काश्मीर मध्ये दहशतवाद्यांशी लढताना 24 मार्च 2003 रोजी वीरमरण आले. त्यामुळे 24 मार्च या दिवशी कॅ.विनयकुमार सचान यांचे स्मृतीप्रित्यर्थ महापालिकेतर्फे डोंबिवली येथील वै.ह.भ.प.सावळाराम महाराज म्हात्रे क्रीडा संकुलातील त्यांच्या स्मारकास पुष्पचक्र अर्पण करून आदरांजली वाहण्यात येते. आज कॅ.विनयकुमार सचान यांचे स्मृती प्रित्यर्थ त्यांचे पिता राजाबेटा सचान यांनी कॅ.विनयकुमार सचान स्मारकास पुष्पचक्र अर्पण करुन आदरांजली वाहिली. त्याचप्रमाणे मा.आमदार राजेश मोरे, महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड, परिमंडळ-3 चे पोलीस उपआयुक्त अतुल झेंडे, डोंबिवलीतील पद्मश्री पुरस्कार विजेते गजानन माने, माजी पालिका सदस्य तात्या माने, रेखा चौधरी त्याचप्रमाणे हुतात्मा प्रतिष्ठानच्या वतीने निवृत्त लेफ्टनंट कमांडर सुनिल कांबळे तसेच इतर मान्यवरांनी देखील कॅ.विनयकुमार सचान स्मारकास पुष्पचक्र अर्पण करून आदरांजली वाहिली. सदर स्थळी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमार्फत प्रदर्शित करण्यात आलेल्या युध्द नौका आय.एन.एस.विक्रमा अदित्य, आय.एन.एस. मोरमुगोआ, आय.एन.एस.करमुक या शीप मॉडेलची तसेच फायटर प्लेन सुखोई, राफेल, जग्वार, तेजस, मीग इत्यादींच्या प्रतिकृतींची मान्यवरांनी पाहणी करुन, विद्यार्थ्यांची प्रशंसा केली. यासमयी महापालिका उपायुक्त रमेश मिसाळ, संजय जाधव, महापालिका सचिव किशोर शेळके, कार्यकारी अभियंता मनोज सांगळे, सहा.आयुक्त हेमा मुंबरकर, संजयकुमार कुमावत व इतर अधिकारी वर्ग यांनी देखील कॅ.विनयकुमार सचान यांच्या स्मारकास पुष्पसुमने अर्पण करून आदरांजली वाहिली.

हुतात्मा प्रतिष्ठानचे इतर पदाधिकारी यांनी देखील कॅ.विनयकुमार सचान यांच्या स्मारकास पुष्पसुमने अर्पण करून आदरांजली वाहिली. यावेळी विविध महाविद्यालयातील विद्यार्थी, इतर मान्यवर तसेच नागरीक बहुससंख्येने उपस्थित होते.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
**जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली**
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
**प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!**

| अ.क्र. | अभ्यासक्रम | कालावधी |
| --- | --- | --- |
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) | ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

# म्हाडाच्या जागांवरील अनधिकृत बांधकामांवर कारवाई होणार

## – मंत्री उदय सामंत

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई : मुंबई शहर व उपनगरात घाटकोपर-मानखुर्द लिंक रोड, कोळीवाडा, वाशी नाका चेंबूर आणि धारावीच्या साईबाबानगर परिसरात अनधिकृत बांधकाम उभे राहिले आहे. म्हाडाच्या जागांवरील अनधिकृत बांधकामाबाबत चौकशी करून कारवाई करण्यात येईल, असे मंत्री उदय सामंत यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात सांगितले. याबाबत सदस्य संजय उपाध्याय यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती. मंत्री सामंत म्हणाले, या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात येईल. अनधिकृत बांधकाम काढून टाकण्याची म्हाडाच्यावतीने कारवाई लवकरात लवकर होईल. विशेषतः राखीव भूखंड, सार्वजनिक जागा आणि खासगी मालमत्तांवर अतिक्रमण करून बांधकामे उभारल्याचे समोर आले आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी विशेष समिती गठित करण्यात येणार असून, अनधिकृत बांधकाम काढून टाकण्यासाठी कडक पावले उचलली जातील.

## संक्षिप्त

### अरविंद उबाळेंना 'महाराष्ट्र रत्न' पुरस्कार



पेण : महाराष्ट्र रत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला. आपल्या श्रेष्ठता शैक्षणिक व सामाजिक फाउंडेशनच्या माध्यमातुन अनेक गरजु मुलांना ते मदत करत असतात. कोरोना काळात अनेक लहान मुलांना दूध, अनेक कुटुंबाना किराणा सामान देण्यासाठी पुढे आले. जसे जमेल तसे शाळेतील मुलांना शैक्षणिक साहीत्य दिले. ते स्वतः एक कवी असून त्यांच्या अनेक कविता, लेख वर्तमान पत्रातून प्रसिद्ध होत असतात. आपल्या लिखाणातून ते सामाजिक प्रबोधन करत असतात. बुद्धीस्ट सोसायटी ऑफ इंडियाच्या माध्यमातुन अनेक सामाजिक उपक्रम ते सहका-यांसोबत राबवित असतात.या सर्व कार्याचा विचार करून अत्यंत प्रतिष्ठित समजला जाणारा 'महाराष्ट्र रत्न' पुरस्कार अरविंद उबाळे यांना रविवारी पुण्यातील भारत इतिहास सभागृह सदाशीव पेठ येथे आयोजित कार्यक्रमात मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानपुर्वक प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमास पोलिस उपायुक्त प्राची थोरात, मुख्य तपास अधिकारी रामजीत गुप्ता, साहित्यिक अभिनेता संतोष जाधव, विद्रोही कवी आम्रपाली पारवे, राज्य शिक्षण सल्लागार डॉ. अंजना खताळ, अभिनेत्री चित्रा दिक्षीत, महाराष्ट्र पोलिस संगीता ढोले आदी मान्यवर उपस्थित होते. या पुरस्काराने माझी जबाबदारी आणखी वाढली आहे तसेच माझे कुटुंब, माझा मित्र परिवार यांची नेहमीच सोबत असल्याचे अरविंद उबाळे यांनी सांगितले.

### मानिवली शाळेत चावडी वाचन उपक्रम




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
शहापूर ग्रामिण : मानिवली येथील पीएम श्री उच्च माध्यमिक शाळेत विद्यार्थ्यांचा चावडी वाचन हा उपक्रम घेण्यात आला.

विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी मानिवली येथील पीएम श्री उच्च माध्यमिक शाळेतील इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांचा चावडी वाचन हा उपक्रम घेण्यात आला. सदर उपक्रमांतर्गत बहुतांश विद्यार्थ्यांनी चावडी वाचन केले. यामध्ये विद्यार्थ्यांचे इंग्रजी, मराठी व हिंदी या तीनही विषयातील पाठांचे वाचन घेण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी आरोह अरोहा सहित विराम चिन्हांचाही वाचन केले, विद्यार्थ्यांच्या या उत्कृष्ट वाचनाचे कौतुक करण्यात आले. उत्कृष्ट चावडी वाचन करणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षिसे घोषित करण्यात आले असल्याचे शाळेच्या शिक्षिका मंगल डोईफोडे यांनी म्हटले.

या उपक्रमावेळी शाळेचे मुख्याध्यापक विजय प्रगणे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष ज्योतीताई गायकर, शिक्षक मंगल डोईफोडे, माधुरी जंगले, नंदू चौधरी, पूजा माळी, नाजुका गायकर, ग्रामस्थ महिला नीलम गायकर, कल्पना गायकर इत्यादी उपस्थित होते.

# कल्याण डोंबिवली मनपाकडून आदर्श शिक्षक पुरस्कारांचे वितरण




## शिक्षकांनी चांगले विद्यार्थी घडवावेत

### - केडीएमसी आयुक्त डॉ इंदु राणी जाखड

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण : विद्यार्थ्यांशी सुसंवाद ठेवून शिक्षकांनी चांगले विद्यार्थी घडवावेत म्हणजेच चांगले नागरिक घडतील असे प्रतिपादन कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त डॉ इंदु राणी जाखड यांनी आज केले. महापालिकेच्या आचार्य अत्रे रंगमंदिरात आयोजिलेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात बोलताना त्यांनी हे प्रतिपादन केले.

विद्यार्थ्यांना संस्कार देताना, शिकवताना आपली व्हॅल्यू सिस्टीम विसरु नये, प्रत्येक मुलाकडे टॅलेंट हे असतंच, पण या मुलांना योग्य संधी मिळण्यासाठी शिक्षकांनी आणि शाळेने देखील प्रयत्न करावेत असे त्या पुढे म्हणाल्या. यावेळी व्यासपीठावर शिक्षण विभागाचे उपायुक्त संजय जाधव, प्रशासन अधिकारी रमेश चव्हाण, महापालिकेचे शिक्षणाधिकारी विजय सरकटे, विनोबा भावे ॲपचे डायरेक्टर संजय दालमिया तसेच युवासेना जिल्हा चिटणीस वैभव भोईर हे उपस्थित होते.

शिक्षक हेच मुलांमध्ये आमूलाग्र बदल घडवू शकतात, उद्याच्या भारताचा आधारस्तंभ असलेल्या मुलांना घडविण्याचे काम शिक्षकांचेच आहे, सरकारी शाळांची यंत्रणा मजबूत आणि सक्षम होणे आवश्यक आहे. असे प्रतिपादन विनोबा भावे ॲपचे डायरेक्टर संजय दालमिया यांनी या कार्यक्रमात केले.

केडीएमसी आयुक्त डॉ इंदु राणी जाखड यांनी पदभार स्वीकारल्यापासून शिक्षण विभागाचा कायापालट करण्याचा संकल्प केला आणि आता तो सत्यात उतरत आहे. महापालिका शाळांची पटसंख्या वाढविण्यासाठी आम्ही आता बालवाड्यांचे बळकटीकरण करीत आहोत अशी माहिती शिक्षण विभागाचे उपायुक्त संजय जाधव यांनी आपल्या प्रास्ताविकात दिली.

या पुरस्कार वितरण सोहळ्यात महापालिका शाळांमधील सहशिक्षक संतोष कोलेकर, सपना पाटील राजेंदर कौर तर खाजगी शाळांमधील सहशिक्षक जोशना पाटील ,अपर्णा हर्षे, रुचिरा दळवी यांचा शाल श्रीफळ व स्मृतीचिन्ह स्वरूपात आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. त्याचप्रमाणे अपेक्षा थोरात, व लिना भंडारी या महापालिका शाळेतील विद्यार्थिनींना आदर्श विद्यार्थी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

तसेच मनपा शाळा क्रमांक 12 उंबर्डे आणि प्राथमिक विद्यामंदिर मांडा टिटवाळा या शाळांना आदर्श शाळा पुरस्कार प्रदान करण्यात आला. शैक्षणिक साहित्याबाबत व्हिडिओ निर्मिती स्पर्धेतील विजेत्या विजेत्या पंधरा शिक्षकांना यावेळी स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन यावेळी गौरविण्यात आले.

# उंबर्डे येथील डम्पिंग ग्राउंडला आग



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण : कल्याण डोंबिवली मनपाच्या उंबर्डे येथील कचरा प्रकल्पातील कचऱ्याने मंगळवारी दुपारच्या सुमारास अचानक पेट घेतला. काही क्षणातच आगीने रौद्ररूप धारण केले. त्यामुळे परिसरात धुराचे लोट उसळल्याची घटना घडली.

उंबर्डे कचरा प्रकल्पात कचर्याने पेट घेतल्याची घटना दुपारी पावणे तीनच्या सुमारास घडली. यामुळे परिसरात धुराचे लोट उसळले. वातावरणातील उष्णता आणि धुराचे लोट उसळल्याने परिसरातील वातावरण धुरमय झाले. आगीची माहिती मिळताच कल्याण डोंबिवली मनपाच्या अग्निशमन दलाने तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. अग्निशमन दलाच्या सहा गाड्या आणि पाण्याचे टँकर घटनास्थळी दाखल झाले. तीन तासाच्या अथक प्रयत्नांतर आगीवर नियंत्रण मिळवण्यास अग्निशमन विभागाला यश आले आणि अग्निशमन दलाच्या जवानांनी कुलिंग ऑपरेशन सुरू केले. आगीचे कारण मात्र अद्याप अस्पष्ट असल्याचे मुख्य अग्निशमन आधिकारी नामदेव चौधरी यांनी सांगितले.

# खतांची, बियाणांची विक्री व वितरणासंदर्भातील तक्रारींचे निराकरण करण्यासाठी नियंत्रण कक्षाची स्थापना करा

## सीईओ चे आदेश

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण : जिल्हा कृषी विभागातर्फे आगामी खरीप हंगामात . खतांची, बियाणांची विक्री आणि वितरणासंदर्भातील तक्रारींचे निराकरण करण्यासाठी जिल्हास्तरावर नियंत्रण कक्षाची स्थापना करण्याचे आदेश जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी दिले आहेत तसेच खरीप हंगामामध्ये शेतकऱ्यांना खते, बि-बियाणे याबद्दल कोणतीही अडचण येणार नाही यासाठी कृषी विभागाने सतर्क राहण्याच्या सूचना देखील त्यांनी दिल्या आहेत.

ठाणे जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्र 4 लक्ष,09,186 हेक्टर एवढे असून त्यापैकी खरीप हंगामा खालील सर्वसाधारण क्षेत्र 65, हजार909 हेक्टर एवढे आहे. जिल्ह्यात खरीप हंगामात मुख्यत: भात पिकाची लागवड केली जाते. त्याचप्रमाणे भाजीपाला, चारापिके, कडधान्य व काही प्रमाणात गळीत धान्य इत्यादी पिकांचीही लागवड केली जाते.

भातपिकाखालील सर्वसाधारण क्षेत्र 55, हजार हेक्टर एवढे असून मागील वर्षी 54, हजार 923 हेक्टर क्षेत्रावर भात लागवड करण्यात आली होती व 4हजार,989 हेक्टरवर इतर पिकांची लागवड करण्यात आली होती.

खरीप हंगाम 2025 मध्ये भात पिकाखालील अपेक्षित लागवडीखालील क्षेत्र 55,हजार हेक्टर एवढे ग्रहित धरले असून त्यासाठी शासनाकडे 10,हजार120 क्विंटल भात बियाणांची मागणी करण्यात आली आहे. खाजगी कंपन्यांचे 8 हजार ,820 क्विंटल व महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाकडील 1हजार,300 क्विंटल बियाणांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे भाताचे अधिक उत्पन्न वाढण्यासाठी व संकरित पिकाखालील क्षेत्र वाढण्यासाठी 1, हजार 360 क्विंटल संकरित बियाणांची मागणी नोंदविण्यात आली आहे. प्रत्यक्षात बियाणे वाटप किंवा खते खरेदी करताना बोगस बियाणे, खतांची भेसळ, पेरणीनंतर भात न उगवणे अश्या तक्रारी शेतकरी करीत असतात, यावेळी त्यांच्या तक्रारी चे तात्काळ निवारण व्हावे, तसेच बियाणे, खते मिळणासाठी त्यांना अडचणी येणार नाहीत याबाबत सतर्क राहण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी कृषी विभागाला दिले आहेत.

तर खरीप हंगामाकरिता शासनाकडे 10,हजार324 मे. टन रासायनिक खतांची मागणी करण्यात आली होती. शासनाकडून ठाणे जिल्ह्याकरिता 11,हजार122 मे टन रासायनिक खते मंजूर करण्यात आली आहेत. सदर खतांमध्ये युरिया 9हजार,215 मे टन, डीएपी 167 मे टन, संयुक्त खते 1,हजार700 मे. टन व इतर खते 140 मे. टन यांचा समावेश आहे, अशी माहिती कृषी विकास अधिकारी एम. एम. बाचोटीकर यांनी दिली.

# होपमिरर फाउंडेशनच्या वतीने इफ्तार पार्टीचे आयोजन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण : होपमिरर फाउंडेशनचे संस्थापक रमझान शेख यांच्या वाढदिवसानिमित्त एका संस्मरणीय इफ्तार पार्टीचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात विविध समुदायातील लोकांना एकत्र आणले गेले, जे एकता आणि सौहार्दाच्या सुंदर भावनेचे प्रतीक आहे.

संजोग वाघेरे पाटील (शिवसेना उबाठा), बाळाराम पाटील (शेकाप), बबन पाटील (शिवसेना उबाठा), सतीश पाटील (राष्ट्रवादी श.प), सुदाम पाटील (काँग्रेस) आणि भावना घाणेकर (राष्ट्रवादी श.प) यासारख्या प्रमुख व्यक्तींनी उपस्थिती दर्शविली. त्यांच्या उपस्थितीने फाउंडेशनच्या उपक्रमांना आणि एकत्रिततेच्या त्यांच्या सामायिक दृष्टिकोनाला त्यांचा पाठिंबा अधोरेखित केला. या मेळाव्यात मुस्लिम आणि हिंदू समुदायांचा सक्रिय सहभाग होता, ज्यात आंतरधर्मीय सद्भाव आणि परस्पर आदर दिसून आला. हा कार्यक्रम विविध क्षेत्रातील लोकांना एकत्र येण्यासाठी, संवाद साधण्यासाठी आणि बंध मजबूत करण्यासाठी एक व्यासपीठ बनला.

रमझान शेख यांनी शांततापूर्ण सहअस्तित्व आणि सुसंवादी जीवनाचे महत्त्व अधोरेखित करून एक प्रेरणादायी संदेश दिला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी त्यांनी उपस्थितांचे आणि होपमिरर फाउंडेशन टीमचे मनापासून आभार मानले.






पोलीस आयुक्तय, ठाणे शहर

## शहर वाहतूक उपविभाग–कोळशेवाडी

वाहतुक नियंत्रण विभाग, ठाणे शहर
kolsewaditraffic1@gmail.com

१) कोळशेवाडी वाहतुक उपविभाग येथे जमा असलेल्या बेवारस – ३७ वाहनांची यादी.

| अ.क्र. | वाहन क्र. | इंजिन नंबर | चेसिस नंबर | वाहनाचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| १ | MH 05 BP 9507 | JE2WCG50418 | MD2A37CZ6CWG10241 | बजाज डिसकवर |
| २ | MH 05 BT 8084 | JE2WCG50418 | MD2A37CZXDWK12271 | बजाज डिसकवर |
| ३ | MH 05 AF 2536 | - | DVVBMF0769 | होडा एव्हीएटर |
| ४ | MH 05 AH 4534 | - | - | टी व्ही एस |
| ५ | MH 05 AT 9435 | HA10EAA9E2279 | MBLHA10JA9E16649 | स्प्लेंडर |
| ६ | MH 05 AE 8043 | - | - | हिरोड होंडा पेंशन |
| ७ | MH 05 AP 6755 | JF08E56135500 | ME4JF083M88582069 | ॲक्टीवा |
| ८ | MH 05 AD 2485 | - | 05A09C5658 | हिरोड होंडा पेंशन |
| ९ | MH 05 RP 2151 | - | MBLKC13EAB4400986 | हक |
| १० | MHOS BS 9076 | JEZWDH55214 | MDZA17C24DWH38145 | बजाज पल्सर |
| ११ | MH 14 AP 0324 | | 05J16C0210. | स्प्लेंडर |
| १२ | विदाऊट नंबर | - | - | शाईन मो सा |
| १३ | विदाऊट नंबर | - | - | पॅशन |
| १४ | MH 05 AY 2468 | - | - | |
| १५ | विदाऊट नंबर | - | - | बुलेट |
| १६ | MH 05 AK 9412 | JC36E9090287 | ME4JC368H78011229 | होंडा शाईन |
| १७ | MH 06 AE 5062 | | | |
| १८ | MH 03 AS 2781 | JF08ES736414 | ME45F083B98704966 | होंडा ॲक्टीवा |
| १९ | विदाऊट नंबर | - | - | पेंशन |
| २० | विदाऊट नंबर | - | - | बजाज डिसकवर |
| २१ | MH 04 DV 0741 | HA10EB8GK94680 | MBLHA 10EL8GK47814 | पॅशन प्लॅस |
| २२ | MH 02 BX 0781 | 21C2028801 | ME121C02892029980 | यामाहा एफ झेड |
| २३ | विदाऊट नंबर | | | ए.एफ डिलक्स |
| २४ | MH 05 DD 6533 | JF50ET5000163 | ME45F507DHT000086 | ॲक्टीवा |
| २५ | MH 05 AC 6740 | | 04304JP F61 | |
| २६ | MH 43 AX 1085 | JF39E71036196 | ME4JF393F7036317 | डिओ |
| २७ | MH0 04 BE 8743 | | U10721C09199 | पॅशन |
| २८ | MH 05 DM 6289 | JC65E71082554 | ME4JC654CH7057519 | सीबी शाईन |
| २९ | MH 05 DW 1015 | AF216006959 | MB8DP11AHJ8997537 | ॲक्सीस |
| ३० | MH 05 AQ 3800 | JC44E0146719 | ME4JC445F91146712 | ॲक्टीवा |
| ३१ | MH 05 AL 5238 | DUMBPG43930 | MD2DDDZZZPWG64267 | बजाज प्लॅटीना |
| ३२ | MH 05 BC 3724 | JZMBUD22884 | MD2D5JZZZUWD19868 | बजाज डिसकवर |
| ३३ | MH 01 1100 | - | - | सुझकी आ एक्स 100 |
| ३४ | विदाऊट नंबर | - | - | पॅशन |
| ३५ | विदाऊट नंबर | - | - | डिओ |
| ३६ | विदाऊट नंबर | - | - | सी.बी झेड |
| ३७ | विदाऊट नंबर | - | - | टी.व्ही.स ब्राउन |

२) कोळशेवाडी वाहतुक उपविभाग येथील कर्षित – ०४ वाहनांची यादी.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | MH 05 Q 7940 | – | – | स्प्लेंडर |
| २ | MH 05 AT 1122 | JC44E0541009 | ME4JC446CA8127382 | ॲक्टीवा |
| ३ | MH 03 BF 9303 | JF44E1909520 | ME4JC448BC87798419 | ॲक्टीवा |
| ४ | MH 07 N 7017 | JNGBSE13614 | MD2DSTNZZSCE65707 | बजाज डिसकवर |

३) कोळशेवाडी वाहतुक उपविभाग येथे मोवाकाक १८५ प्रमाणे कारवाई जप्त–२८ वाहनांची यादी

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | MH 05 Q 5977 | E19F10805 | – | स्प्लेंडर |
| २ | MH 05 AH 8581 | – | – | बजाज पल्सर |
| ३ | MH 05 AW 3558 | JBMBTJ71100 | MD2DSPAZZTWJ39186 | बजाज डिसकवर |
| ४ | MH 14 AK 1665 | 04G15E11679 | 04G15F00127 | स्प्लेंडर |
| ५ | MH 05 AE 0385 | – | – | स्प्लेंडर |
| ६ | MH 05 AY 1252 | JF08E5258755 | ME4J083C88227336 | ॲक्टीवा |
| ७ | MH 02 DA 6246 | – | – | स्प्लेंडर |
| ८ | MH 05 BZ 2630 | JBZWDJ92337 | MD2A14AZ6DWJ37818 | बजाज डिसकवर |
| ९ | MH 05 CX 4966 | KC23E80066148 | ME4KC231EG8052074 | हॉरनेट |
| १० | MH 43 AQ 3400 | F4862416860 | MB8CF4CAKD8220494 | ॲक्सेस |
| ११ | MH 05 AL 6509 | 07K15E41060 | 07K03F19235 | स्प्लेंडर प्लस |
| १२ | MH 05 AQ 5943 | 21C2020655 | ME121C02792022669 | एफ.झेड |
| १३ | MH 05 AP 6855 | JF08E5649442 | ME4JF083M86817947 | ॲक्टीवा |
| १४ | MH 05 AQ 4110 | F486241276 | MB8CF4CAG98241283 | ॲक्सेस |
| १५ | MH 05 AU 7510 | JC44E0914153 | ME4JC4495A8037558 | ॲक्टीवा |
| १६ | MH 04 ER 7541 | KC09E6017154 | ME4KC09CEA8016922 | युनिकॉर्न |
| १७ | MH 06 AY 9982 | 0G3GA2197050 | MD626BG38A2G12872 | स्कुटी पेप प्लस |
| १८ | MH 05 DD 8084 | JF50ET5000163 | ME45F507DST000086 | ॲक्टीवा |
| १९ | MH 05 DD 0324 | JF50EV6204405 | ME4JF509AHU122032 | ॲक्टीवा |
| २० | MH 05 CD 9998 | JF32AAEGD14811 | MBLJF32ABEGD14726 | मेस्ट्रो |
| २१ | MH 05 CU 6042 | HA10EVFHN29269 | MHLHA10BSFHM28166 | पॅशन प्रो |
| २२ | MH 04 JE 8770 | JC65E70661720 | ME4JC652JG7205971 | सी.बी.शाईन |
| २३ | MH 05 EG 9643 | JF50EW0272795 | ME4JF50ALKW276263 | ॲक्टीवा |
| २४ | MH 05 AT 8094 | HA10EDAGE42872 | MBLHA10AHAGE17239 | पॅशन प्रो |
| २५ | MH 05 AF 3044 | – | – | होंडा ॲक्टीवा |
| २६ | MH 05 AV 8490 | JC40E5048476 | ME4JC40CLA8038493 | स्टनर |
| २७ | MH 05 AR 0893 | JNGB5G38995 | MB2D5JNZZ5G98714 | बजाज डिसकवर |
| २८ | MH 05 U 7317 | – | – | स्प्लेंडर |

४) कोळशेवाडी वाहतुक उपविभाग येथे इम्पाऊंडेड केलेले वाहन – ०२ वाहनांची यादी

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | MH 05 BT 1240 | F4862222636 | MB8CF4CAAD8317612 | ॲक्सेस |
| २ | MH 05 AV 7023 | JEGBTJ19673 | MD2JD5DZZTC588092 | बजाज पल्सर |

सही/-,
पोलीस निरीक्षक
शहर वाहतूक उपशाखा कल्याण

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024